# 'अभियांत्रिकी'-क्विक हिलमध्ये करार

**कऱ्हाड, ता. ८ :** शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय व क्विक हिल फाउंडेशन यांच्यात सायबर सुरक्षेसाठी नुकताच सामंजस्य करार झाला. 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमाची प्रभावी सुरुवात नुकतीच करण्यात आली.

विद्यार्थ्यांत सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे, समाजात जनजागृती घडवणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना विविध शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी सायबर सुरक्षेवरील सादरीकरणे करण्याची संधी दिली जाणार आहे. विशेष म्हणजे या उपक्रमाचा समावेश 'कमवा आणि शिका' योजनेत केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक लाभाबरोबरच अनुभव व आत्मविश्वास प्राप्त होईल. क्विक हिल फाउंडेशनच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमाची अंमलबजावणी केली जात आहे.




**पुणे :** सायबर सुरक्षा सामंजस्य कराराप्रसंगी अनुपमा काटकर, अजय शिर्के, गायत्री केसकर, साक्षी लवंगरे, दीपू सिंह आदी.

पुण्यातील क्विक हिल फाउंडेशनच्या मुख्य कार्यालयात प्रशिक्षण कार्यशाळा झाली. त्यात संस्थेच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, अजय शिर्के, गायत्री केसकर, साक्षी लवंगरे, दीपू सिंह यांनी सायबर गुन्हेगारी, तिचे परिणाम व प्रतिबंधक उपाय याविषयी मार्गदर्शन केले. क्लबमध्ये प्रतीक गुंजाळकर, अनुराग वाझरकर, प्राजक्ता पवार, वैष्णवी निकम हे विद्यार्थी सक्रिय सदस्य आहेत. प्रशिक्षणात या सर्व विद्यार्थ्यांनी, तसेच मार्गदर्शक प्रा. डॉ. प्रियांका शिंदे यांनी सहभाग घेतला. सायबर सुरक्षेबाबत समाजात सकारात्मकता निर्माण होणे आणि विद्यार्थ्यांना समाजोपयोगी कार्यात प्रत्यक्ष सहभाग घेता यावा, हा या उपक्रमाचा केंद्रबिंदू आहे. सहभागी विद्यार्थ्यांनी उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.